
हॅरोल्डच्या परीकथा




जॉन्सन

मराठी: अश्विनी बर्वे




एके संध्याकाळी हॅरोल्ड अंथरुणातून उठला, आपला जांभळा खडू आणि चंद्र सोबत घेऊन एका जादुई बागेत फिरायला गेला.




त्यात काहीच उगवलेले नव्हते.
जर त्याला ते एक जादुई उद्यान आहे हे
माहीत नसते, तर हेरॉल्डने त्याला उद्यान
म्हटलेच नसते.

बाग अशी का आहे हे राजाला
विचारावे असे त्याने ठरवले.




राजा राजवाड्यात राहत होता. हेरॉल्डने खात्री करून घेतली की राजाला शोभेल असा राजवाडा आहे.याची .

हॅरोल्डला कोणत्याही राजकन्येशी, राजपुत्राशी, सरदारांशी बोलण्यात वेळ घालवायचा नव्हता.




हा राजाचा राजवाडा होता.
त्याला मोठमोठे मनोरे होते आणि राजाला नको
असलेल्या लोकांना बाहेर ठेवण्यासाठी एक मोठे दार.

पण जेव्हा त्याने बंद दाराचे चित्र काढले
तेव्हा हेरॉल्ड बाहेरच राहिला.




हॅरोल्डने राजाला खूप हाका मारल्या, दार उघडा आणि मला आत घ्या. पण गेट उघडले नाही.

तो राजवाडाच्या भिंतीजवळून जादुई बागेच्याकडेने तोपर्यंत चालत गेला,जोपर्यंत त्याला त्याच्या जांभळ्या खडूची आठवण झाली नाही.




एका लहान उंदरापेक्षाही लहान व्यक्ती, न वाकताच एका
लहानशा उंदराच्या बिळात शिरू शकली असती.




त्याने उंदराच्या बिळातून राजवाड्यात प्रवेश केला, त्याने उंदराला पण आत बोलावले पण उंदराने बाहेरच राहण्याचा निर्णय घेतला.




जेव्हा हॅरोल्डने प्रचंड राजवाडयाचे निरीक्षण केले तेव्हा त्याला तो स्वतः खूप चिमुकला वाटला.



आणि राजा उंदरापेक्षा लहान असलेल्या
कोणाकडेही फारसे लक्ष देणार नाही. म्हणून
हॅरोल्डने पुन्हा आपला जांभळा खडू वापरला.




त्याने खात्री करून घेतली की तो
त्याच्या नेहमीच्या उंचीइतका, म्हणजे
साडेचार पायऱ्यांइतका उंच आहे.




मग तो राजाकडे पाहत पायऱ्या चढू लागला.


तो इतका थकला की पुढची एक पायरीही चढू शकला नाही.



सुदैवाने पुढे पायऱ्या नव्हत्या.
त्याला अजूनही राजा सापडला नव्हता.
पण तो शिखरावर पोहोचला.
त्याला आठवले की राजे सिंहासनावर बसतात.



राजाचे सिंहासन एकदम आरामदायी झाले होते.
हेरॉल्डने विचार केला की त्याने थोड्यावेळ या
सिंहासनावर आराम केला तर राजाला त्याचे काही
वाटणार नाही.




मग हॅरोल्ड सिंहासनावर बसला आणि त्याला
वाटले की त्याने मुकुट घातला आहे आणि
तो राजा झाला आहे.




मग त्याने राजाचा मुकुट घातला.



थोड्यावेळ ते सगळं बरं वाटलं पण नंतर
तो मुकुट जड होऊ लागला.




म्हणून मग हेरॉल्डने तो मुकुट
राजाच्या डोक्यावर ठेवला.



हॅरोल्ड राजाचे मुकुटासाठी आभार मानू लागला
तेव्हा त्याच्या लक्षात आले की राजा दुःखी
आहे,नक्कीच उजाड बागेमुळेच असेल..




त्याने राजाला विचारले की हा त्रास एखाद्या
चेटकिणीमुळे आहे की राक्षसामुळे.
राजाला नक्की सांगता आले नाही.
पण तो दुःखी आणि हताश दिसत होता.




स्पष्टपणे राजाला कळत नव्हते की तो
राक्षस किंवा चेटकीणीमुळे दुःखी आहे का?
कारण ते अदृश्य होते.
पण हॅरोल्डने राजाला सांगितले की काळजी करू नका.




तो आपला जांभळा खडू घेऊन अदृश्य
चेटकिणीला किंवा राक्षसाला शोधायला
निघाला. आणि—अपघाताने—त्यामुळे
भिंतीला एक छिद्र पडले.




त्या अपघातामुळे हॅरोल्डला लाज वाटली. पण
किल्ल्यातून बाहेर पडण्याचा तो सर्वात सोयीचा
मार्ग होता आणि तो त्यातून गेला.




जेव्हा त्याने पलीकडून खाली पाहिले,
तेव्हा त्याला जाणवले की छिद्रातून खाली उतरण्यासाठी
त्याला एखाद्या उंच वस्तूची गरज होती.
तो खूप उंचीवर होता.




किल्ल्यातील खड्डा भरण्यासाठी हॅरोल्डने
त्यात एक सुंदर आणि उपयुक्त घड्याळ
बसवले. किती उशीर झाला आहे हे पाहून
त्याला आश्चर्य वाटले.




तो कळसावरून खाली घसरला,
जेणेकरून त्याला ती अदृश्य चेटकीण
किंवा राक्षस लगेचच सापडेल.



. तो कळस नव्हता.
ती एक टोकदार टोपी होती.



ती एक महाकाय चेटकीण होती!



जांभळ्या क्रेयॉनने ते स्पष्ट
केले—ती एक अदृश्य राक्षसी
चेटकीण होती. म्हणूनच तर त्या
जादुई बागेत काहीच उगवत नसे.



कोणतीही गोष्ट कशी वाढू शकेल?
हेरॉल्ड स्वत:शीच म्हणाला, एक विशालकाय
चेटकीण मोठ्या पायांनी तुडवत आहे.




आता अडचण काय आहे हे लक्षात आल्यावर, हॅरोल्डला फक्त त्या चेटकिणीला जादुई बागेतून हाकलून द्यायचे होते.


डास! हॅरॉल्डला माहीत होतं की, डास कोणालाही बागेतून हाकलून लावू शकतात.




डासांनी चेटकिणीला हाकलून लावले.
ते हॅरोल्डलाही बागेतून हाकलून लावत होते.
डासांपासून सुटका मिळवण्यासाठी त्याला
धूर करावा लागला.



आग विझवण्यासाठी, त्याने प्रथम पावसाचा विचार केला.
आणि त्याने एकदा कोणालातरी असे म्हणताना ऐकले होते
की, जिथे धूर आहे तिथे आग असलीच पाहिजे.
पण त्याने ठरवले की, त्यापेक्षा पाऊस सोपा आहे.




पावसाने सगळं काही भिजवलं होतं—
हॅरोल्डलासुद्‌धा. त्याचं म्हणणं खरं होतं.
लवकरच तिथे फुलं उमलली.पण, तो म्हणाला,
हे फुलांसाठी चांगलं आहे.




त्या जादुई बागेत सर्वत्र सुंदर फुले उमलली होती, हॅरॉल्डला मोजताही येणार नाहीत इतकी, आणि ती सर्व डौलदारपणे फुलली होती.

हॅरोल्डला वाटले की, सकाळी राजवाड्यातून बाहेर पाहिल्यावर राजा किती आनंदित आणि सुखी दिसेल.




आणि मग, आश्चर्याची गोष्ट म्हणजे, शेवटचे फूल मुळीच फूल नसून एक सुंदर परी निघाली. तिने आपली जादूची कांडी पुढे केली, जणू काही परीच, ती सगळ्यांना आपल्या पूर्ण होण्याचे वरदान देत असतात.




हॅरोल्डला इच्छा मागण्यासाठी काहीच सुचत नव्हते. शिवाय,
घरी परतण्याच्या लांबच्या प्रवासाला निघताना हॅरोल्डने विचार केला,
'कदाचित एखादी इच्छा कामी येईल आणि ती कधीतरी उपयोगी पडेल.'




त्या सगळ्या उत्साहानंतर त्याला अचानक थकवा जाणवला.
जमीन अजूनही पावसामुळे थोडी ओलसर असल्यामुळे तो
एका लहानशा चटईवर बसला. आणि थोडा वेळ विश्रांती
घेण्यासाठी तो थांबला. आणि त्याला वाटले—









त्याला वाटले की ही चटई एक उडणारा गालिचा असता तर बरे झाले असते. त्याच क्षणी हॅरोल्डला तो हवेत वर जात असल्याचे जाणवले.



तो वेगाने आणि उंच उडाला.



पण जेव्हा त्याने वेगाने चंद्र मागे टाकला, तेव्हा त्याला वाटले की त्याने परीकडून दोन इच्छा मागायला हव्या होत्या, एक उडणाऱ्या गालिच्याला थांबवण्याची किंवा त्याचा वेग कमी करण्यासाठी इच्छा.



पण त्याच्याजवळ त्याचा जांभळा खडू होता.
त्याने उडणारा गालिचा त्याच्या दिवाणखान्यात,
त्याची आई विणकाम करत बसलेल्या उंच पाठीच्या
खुर्चीच्या अगदी मागे उतरवला.

समाप्त